<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

(सकाळ)

जा.क. ६६६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०९/२०१७

**१) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २४/०९/२०१७ चे ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे आपले सहकार्यासह ग्रामस्वच्छता अभियानाचे शासकीय काम करीत असतांना यातील आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत करुन माझे घरासमोरील खड्डा बुजवा असे म्हणुन फिर्यादी सोबत वाद घालुन अश्लिल शब्दात शिवीगाळ, भांडण करुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीचा उजवा हात मुरगळुन फिर्यादीस शासकीय कामकरण्या पासुन परावृत्त केल्याने फिर्यादी याचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५३,३३२,२९४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**२) मोटार पंपची चोरी :—**

दिनांक २०/०९/२०१७ चे १७.३० ते २२/०९/२०१७ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुधाकर माणीकराव कृपाण वय ४२ वर्ष, रा. शहापुर यांचे शेतीला पाणी देण्याकरीता शेताजवळील कवळसी नाल्यावर लावलेली ३ एचपी समर्शीबल मोटार पंप सिरीयल नं. १४६८ किंमती १०,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) टाटा एस गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे एक जखमी :—**

दिनांक २४/०९/२०१७ चे १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने चालवुन पोहरा कडुन मानेगाव सडक कडे येणाऱ्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ए २९६१ टीव्हीएस व्हिक्टर ला धडक देवुन चालक राहुल घनश्याम गोस्वामी वय २७ वर्ष, रा. भिलेवाडा यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी तुकराम श्रीराम बारसागडे वय ५५ वर्ष, रा. मानेगाव सडक यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २४/०९/२०१७ चे १९.४५ वा दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दारु पिऊन दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे श्वासाचा नमुना ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुरले यांचे अहवाला वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोंगाडे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**५) विष प्राशन केल्याने इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २४/०९/२०१७ चे १०.४५ वाजता दरम्यान यातील मृतक अनिल हेतराम पारधी वय ३८ वर्ष, रा. खांबा याने दिनांक २३/०९/०१७ शेतात औषधी मारुन रात्री बरे वाटत नाही असे म्हणुन जेवन न करता झोपी गेला व दिनांक २४/०९/२०१७ ला सकाळी ६.०० वाजता दरम्यान उठुन कामे करुन ०९.३० वाजता दरम्यान पोटात दुखते असे म्हणुन विषारी औषध सेवन केल्याचे पत्नीला सांगितल्याने त्यास औषधोपचारा करीत उपजिल्हा रुग्नालय साकोली येथे आणले असता डॉ. तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी श्रीमती सुनीता अनिल पारधी वय ३२ वर्ष, रा. खांबा हिचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**६) तलावाचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २४/०९/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक नेमाजी मारोती पंधरे वय ४५ वर्ष, रा. तई बुज हा गंगा माहुली तलावाचे पाण्यात बुडुन मृत अवस्थेत त्याचे प्रेत तलावात दिसुन आल्याने पो. स्टे. ला फिर्यादी रमेश रघुनाथ भेंडारकर वय ४६ वर्ष, रा. परसोडी यांनी पोलीस स्टेशनला लेखी तक्रार दिल्या वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. सुनगार पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**७) अवैध दारू /जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक २५/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. वरठी, सिहोरा, लाखांदुर व गोबरवाही येथे अवैध दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून ३२ लिटर हा.भ. दारू किंमती १९२०/—रु, व ६८ लिटर ४० मिली लिटर विदेशी दारु+ १ टवेरा कार किंमती ६,७५,६००/—रु. तसेच जुगारातुन किमती ९२००/रु असा एकुण किंमती ६,७८,४४०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २४/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९० केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि. प्रणती लांजेवार)
महिती कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.